स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade



**EXAMINATION SECTION (SCIENCE FACULTY)**

**Phone: (02462) 229294**
**Fax : (02462) 229520**
**Website: www.srtmun.ac.in**
**E-mail: srtmuncoe@gmail.com**

संदर्भ : परीक्षा/२०१५–१६/4576 दिनांक : १६/०२/२०१६

# सूचना

उन्हाळी २०१६ परीक्षेचे परीक्षा आवेदनपत्र व हिवाळी २०१५ च्या परीक्षेचे पुर्नमुल्याकंन आवेदनपत्र सादर करण्याबाबत विद्यार्थी व महाविद्यालयांना मार्गदर्शक सुचना.

**अभ्यासक्रमांचे नांव :– B.Sc. (General) प्रथम द्वितीय व तृतीय वर्ष.**

०१. विद्यार्थ्यांनी संबंधीत महाविद्यालयात परीक्षा आवेदनपत्र सादर करावयाची तारीख खालील प्रमाणे आहे.
- अ. नियमित शुल्कासह दि. २९/०२/२०१६
- ब. दि. ०१.०३.२०१६ ते १०.०३.२०१६ पर्यंत प्रतिदिन रु.१००/– विलंब शुल्कासह आवेदनपत्र विद्यापीठात स्वीकारले जातील. त्यानंतर कुठल्याही परीस्थीतीत असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

०२. गुणदान संदर्भात तक्रार निवारण पध्दती बाबत...
- अ) १) गुण पडताळणी (व्हेरीफीकेशन) रू.७५/– प्रती पेपर
  - २) उत्तरपत्रीकेची छायांकीत प्रत रू.३५०/– प्रती पेपर
  - ३) छायांकीत प्रती नंतरचे पुनर्मुल्यांकन रु.१५०/– प्रती पेपर
  - ४) थेट पुनर्मुल्यांकन रु.३५०/– प्रती पेपर
- ब) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात गुणपडताळणी, उत्तरपत्रीकेची छायांकीत प्रत सरळ पुनर्मुल्यांकनांचे आवेदनपत्र सादर करण्याचा दि. २९.०२.२०१६ असून, या तारखे नंतर कुठल्याही परीस्थितीत आवेदनपत्र स्विकारले जाणार नाहीत.
- क) महाविद्यालयांने विद्यार्थ्यांकडून प्राप्त शुल्काचा धनाकर्ष काढण्याचा दि. ०१.०३.२०१६
- ड) महाविद्यालयाने धनाकर्ष व आवेदनपत्र विद्यापीठात परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याच्या वेळापत्रकाप्रमाणे पुनर्मुल्यांकनाचे आवेदनपत्र सादर करावेत.
- ई) महाविद्यालयाने विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या उत्तर पुस्तीकेची छायांकीत प्रती संबंधीत विद्यार्थ्यांना त्वरीत वितरीत करून सदर छायाप्रती प्राप्त झाल्यापासून पाच दिवसात इच्छूक विद्यार्थ्यांचे पुनर्मुल्यांकनाचे अर्ज विहीत शुल्कासह (रू.१५०/–प्रती विषय) स्वीकारून ते दोन दिवसात विद्यापीठात सादर करावेत.
- फ) विद्यार्थ्यांना उत्तरपुस्तीकेची छायांकित प्रत किंवा थेट पुर्नमुल्यांकन यापैकी एकच सुविधा घेता येईल.

०३. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काचा धनाकर्ष ''वित्त व लेखा अधिकारी'', स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या नावे काढावा. तो धनाकर्ष दि. **०१.०३.२०१६** किंवा त्या पुर्वीच्या तारखेचा असणे आवश्यक आहे.

परीक्षा शुल्काचा धनाकर्ष विहीत तारखे नंतर काढल्यास १० दिवसा पर्यंत प्रतीदिन रू. ५००/– तर १० दिवसानंतर प्रतीदिन रू. १०००/– अधिभार आकारण्यात येईल.

०४. महाविद्यालयांनी उन्हाळी २०१६ परीक्षा आवेदनपत्र, हिवाळी २०१५ पुनर्मुल्यांकन आवेदनपत्र व विहीत शुल्काचा धनाकर्ष विद्यापीठात सादर करण्याचे वेळा पत्रक खालील प्रमाणे राहील

| अ.क्र. | जिल्हा | महाविद्यालय क्रमांक | तारीख |
|---|---|---|---|
| ०१ | नांदेड | १०१ ते १०७ | ०२.०३.२०१६ |
| ०२ | नांदेड | १०८ ते १२० | ०३.०३.२०१६ |
| ०३ | नांदेड | १२१ ते उर्वरीत सर्व | ०४.०३.२०१६ |
| ०४ | परभणी / हिंगोली | २०१ ते २०७ | ०२.०३.२०१६ |
| ०५ | परभणी / हिंगोली | २०८ ते २२० | ०३.०३.२०१६ |
| ०६ | परभणी / हिंगोली | २२१ ते उर्वरीत सर्व | ०४.०३.२०१६ |
| ०७ | लातूर | ३०१ ते ३०७, ३८५ | ०२.०३.२०१६ |
| ०८ | लातूर | ३०८ ते ३२० | ०३.०३.२०१६ |
| ०९ | लातूर | ३२१ ते उर्वरीत सर्व | ०४.०३.२०१६ |

विहीत तारखेस परीक्षा आवेदनपत्र सादर न केल्यास महाविद्यालयास प्रती विद्यार्थी प्रती दिन रू. २/— किंवा रू. १०००/— या पैकी जे जास्त असेल तो विलंबशुल्क / अधिभार आकारण्यात येईल.

०५. परीक्षा आवेदनपत्र वर्ष निहाय (प्रथम व व्दितीय, तृतीय व चतुर्थसत्र, पाचवे व सहावे सत्र) सादर करणे आवश्यक आहे.

०६. वरील आवेदनपत्रे महाविद्यालयांनी केवळ खास दुतामार्फतच पाठवावीत पोष्टाने किंवा अन्य मार्गाने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

०७ राखीव निकालाच्या पुर्ततेसाठी महाविद्यालयांच्या प्रतीनिधीने विद्यापीठात संपर्क साधून आवश्यक विद्यार्थ्यांच्या निकालातील त्रूटी जसे की पात्रता क्रमांक, राखीव निकाल, प्रशासकीय कारणास्तव कागदपत्रांची पुर्तता करणे इत्यादी, कोणत्याही परिस्थीतीत विद्यार्थ्यांना पाठवू नये. यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय टाळता येईल.

०८. **ज्या विद्यार्थ्यांनी हिवाळी २०१५ च्या परीक्षेच्या संदर्भात पुर्नमुल्यांकन आवेदनपत्र सादर केलेले असतील तरीही त्यांनी उन्हाळी २०१६ परीक्षा आवेदनपत्र सादर करणे अनिवार्य राहील.** हि बाब संबंधीत विद्यार्थ्यांच्या निदर्शेनास आणुन द्यावी. जेणेकरुन विद्यार्थी परीक्षे पासून वंचित राहणार नाहीत.

०९. परीक्षा शुल्क व पुनर्मुल्यांकन शुल्क विद्याशाखानिहाय वेगवेगळे आणावे. कोणत्याही परीस्थितीत सदर शुल्क इतर विद्याशाखेमध्ये किंवा इतर विद्याशाखेमधुन समायोजित करण्यात येणार नाही.

**परीक्षा नियंत्रक**

**प्रत :—**

१ मा.संचालक,म.वि.वि.म.प्रस्तुत विद्यापीठ.
२ मा.वित्त व लेखाधिकारी,प्रस्तुत विद्यापीठ.
३ सर्व विभाग प्रमुख, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.